Reviews of Literature
Impact Factor : 1.4716 (UIF)
Volume 2 , Issue 3 / Oct 2014 ISSN:-2347-2723

# संत गोरा कुंभार : चरित्र व अभंग विशेष

**बाबुराव दत्तात्रय उपाध्ये**
(सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख)
पद्व्युत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र,रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय,श्रीरामपूर ,जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

***सारांश*** — संत ज्ञानदेवांनी 'आध्यात्मिक लोकशाही' ची स्थापना करून १३ व्या शतकात वारकरी संप्रदायाला लोकशक्तीची बैठक प्राप्त करुन दिली. अठरापगड जातीतील माणसाला भक्तीमार्ग खुला झाला. नामदेवांच्या कीर्तनभक्तीचा सर्वत्र प्रभाव निर्माण झाला. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' पुसून काढण्यात ज्ञानदेव-नामदेवांची भक्ती चळवळ प्रेरणादायक ठरली.

## ***प्रस्तावना :-***

१३ व्या शतकामध्ये 'संतमेळा' पंढरीशी, विठ्ठलाशी एकरुप झाला. अद्वैत स्वरुपाचा बोध सर्वांनाच एकत्र आणणारा ठरला. या संतमेळ्यातील एक जुने जाणते संत म्हणजेच संत गोरा कुंभार होय. त्यांचे चरित्र आणि अभंगवाणी मराठी साहित्यात मौलिक ठरली आहे. त्यांच्या चरित्राचा व अभंगवाणीचा महाराष्ट्राला, मराठी माणसाला सार्थ अभिमान आहे. संतमेळ्यातील सर्वांचे 'काका' असणारे संतश्रेष्ठ गोरोबा काकांचे चरित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे.

- **कुंभार घराण्यात जन्म व संस्कार :**

संत गोरा कुंभार जीवनचरित्र भक्तीप्रद व प्रेरक आहे. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील तेर या गावी इ.स. १२६७ साली झाला. शालिवाहन शके ११८९ साली आषाढ शुक्लपक्ष १०, गुरुवारी सायंकाळी ७.३० वाजता जन्म झालेल्या गोरोबांनी आईवडिलांची अपत्य प्राप्तीची इच्छा पूर्ण केली. गोरोबाचे वडील माधवबुवा व आई रखुमाई हे भक्तवत्सल कुटुंब होते.

माधवबुवा व रखुमाई ही धार्मिक पती-पत्नी गावात कुंभाराचा व्यवसाय करीत सुखाने जगत होती. तेर या गावी असलेल्या काळेश्वरावर या कुटुंबाची श्रध्दा होती. हे कुटुंब त्या देवताचे

Reviews of Literature
Impact Factor : 1.4716 (UIF)
Volume 2 , Issue 3 / Oct 2014 ISSN:-2347-2723

उपासक होते. कुंभारकाम करीत हे कुटुंब गरिबीत जगत होते. घराण्याचा धार्मिक संस्कार गोरोबावर झाला. त्यांचे मन भक्तवत्सल झाले. याच वातावरणातून गोरोबाचे व्यक्तिमत्त्व घडले गेले.

- **'गोरी'तून जन्म म्हणून गोरोबा :**

माधवबुवा व रखुमाई या कुंभार कुटुंबाला आठ अपत्ये झाली. परंतु एकही मूल जगले नाही. त्यामुळे हे कुटुंब अतिशय दुःखी होते. या कुटुंबाची श्रध्दा ग्रामदैवत असलेल्या काळेश्वरावर होती. तेथेच जवळ स्मशानभूमी होती. स्मशानभूमीच्या गोरीत आठ मुलांना पुरण्यात आलेले होते.

संत गोरोबांच्या चरित्रात एक आख्यायिका आहे. माधवबुवा व रखुमाई यांची आठही मुले मरण पावल्याने ते दुःखी होते. त्यांनी परमेश्वराचा धावा केला. ''आमच्या नशिबात असे दुःख का निर्माण केले?, हे देवा आम्हाला अपत्याचे सुख नाही का?''

परमेश्वराला या कुटुंबाची दया आली. देवाने सांगितल्याप्रमाणे माधवबुवांनी गोरीत-स्मशानात पुरलेली सात मुले वरती काढली. ती देवाने स्वर्गात पाठविली. आठवा मुलगा देवाने हाताने स्पर्श करताच जिवंत झाला. देवाने कुंभार कुटुंबाची प्रार्थना ऐकून त्या मुलास माधवबुवा व रखुमाईस दिला.

आठवा मुलगा जिवंत होऊन हाती मिळताच माधवबुवा व रखुमाईच्या डोळ्यात पाणी आले. त्यांनी देवाचे आभार मानले, दर्शन घेतले. स्वतः देवानेच सांगितले की, ''या मुलाला गोरीतून काढले आहे. त्यामुळे याचे गोरोबा हे नाव राहील'' आनंदीत झालेल्या या मुलाचे नाव गोरोबा ठेवण्यात आले. तेच गोरा कुंभार म्हणून कुटुंबाची सेवा करीत तेर गावी मान्यता पावले.

आख्यायिकातील भाग चमत्कारिक व आजच्या स्थितीत अशक्य असला तरी मुलगा जिवंत असल्याचे समाधान या कुंभार कुटुंबाला होते. पहिली सात मुले तर मेलेलीच होती. परंतु 'देवाची करणी अन् नारळात पाणी' असते. त्याप्रमाणे त्यांचा आठवा मुलगा जिवंत राहिला, हे येथे महत्त्वाचे आहे. कदाचित स्मशानातील गोरीत पुरतापुरताच शहाण्या माणसांना त्याची हालचाल लक्षात आली असली पाहिजे. ते लक्षात येताच त्याला जणू पुनर्जन्म लाभला असे मानलेले असावे. आख्यायिकामधून जीवनसूत्र लक्षात घेतले तर गोरोबांचा जन्म मोठ्या कष्टातून झाल्याचे लक्षात येते.

- **गोरोबांचा कष्टाळू स्वभाव :**

संत गोरा कुंभार यांचे कौटुंबिक वातावरण श्रध्दामय होते. त्यांचे वडील माधवबुवा मडके घडवत असायचे. आई रखुमाई माती आणायची. मातीत लिद, राख कालवून ती भिजत ठेवायची. रांजण, चुली, परळ अशा मातीच्या वस्तू ती करीत असे. गावात लोकांना वर्षभर गाडगे, मडके द्यायचे व त्याबद्दल अन्नधान्य मिळवून हे कुंभार कुटुंब पोट भरीत असायचे. अशा घरात गोरोबा वाढले. कामधंदा करु लागले.

आपल्या आई-वडिलांवर गोरोबांचे फार प्रेम होते. थकलेल्या आईवडिलांना गोरोबा जपत असायचे. गोरोबा कुंभार काम करु लागले. माधवबुवा व रखुमाई यांना फार आनंद वाटला. आपला मुलगा एक आदर्श मुलगा आहे, आज्ञाधारक आहे याचा त्यांना अभिमान होता. चांगल्या माणसात राहण्याची शिकवण गोरोबाला मिळाली. त्यांचा कष्टाळू स्वभाव व नम्रता त्यांच्या वागण्यात पाहून आईवडील समाधानी झाले.

- **गोराबाचा विवाह :**

गोरोबाचे कष्ट पाहून रखुमाई आपल्या पतीला म्हणाली, "आता गोरोबाचे लग्न केले पाहिजे. तो एकटाच किती दिवस कष्ट करीत राहणार?"

माधवबुवांनी तेर जवळ असलेल्या ढोकी गावातल्या कुंभारबाबांची मुलगी पाहिली. 'ती आपल्या गोरोबाचा चांगला संसार करील' असा विचार केला. माधवबुवा व कुंभारबाबांची चर्चा झाली. लग्न ठरले. कुंभारबाबांची मुलगी संती व गोरोबांचा विवाह अगदी साध्या पध्दतीने पार पाडला.

गोरोबा आता कौटुंबिक गृहस्थ झाले. संती व गोरोबा दोघेही कष्टाळू होते. याच काळात हळूहळू गोरोबांचा संपर्क ज्ञानदेव, नामदेव व इतर संतांशी झाला. संती व गोरोबांनी विठ्ठलभक्ती व पंढरीची वारी महत्त्वाची मानली. वारकरी संप्रदायाचा संस्कार व कुटुंबात वाढला. हे दोघे पतीपत्नी अत्यंत कष्टाळू, नम्र स्वभावाचे व भक्तीमार्गाचे सहप्रवासी होते.

- **मकरेंद्र या मुलाचा जन्म व मृत्यू :**

गोरोबा व संती यांच्या संसारात फार वर्षांनी मुलाच्या जन्माचा आनंद निर्माण झाला. या मुलाचे नाव मकरेंद्र असे ठेवण्यात आले. गोरोबा संतांच्या सहवासात वावरु लागल्यामुळे त्यांच्या विचारात व आचारात चांगले बदल झाले. ते वारकरी झाले. विठ्ठल भक्ती त्यांना महत्त्वाची वाटली. मकरेंद्रच्या जन्माने ते खूप आनंदीत होते. ही परमेश्वराचीच कृपा आहे. त्या विठ्ठलभक्तीत ते तन्मय होत असायचे.

एक दिवस संती घागर घेऊन गावातून पाणी आणण्यासाठी गेली. गोरोबा माती तुडवत होते. पाण्याला जातांना संतीने गोरोबांना सांगितले, "मकरेंद्राकडे लक्ष द्या तो अंगणात खेळत आहे." गोरोबांनी होकारार्थी मान हलवली व ते आपल्या माती तुडविण्याच्या कामात दंग झाले. काम करता करता ते विठ्ठल भक्तीत रमले. अभंगात दंग झाले. माती तुडविता तुडविता बाळ मकरेंद्र त्यांच्या पायाखाली कधी तुडविला ते त्यांना कळलेच नाही. ते भजनातच दंग होते.

- **संतीचा आक्रोश व गोरोबाचे वैराग्य :**

संती पाणी घेऊन घरी आली. समोरचे दृश्य पाहून आईचे हृदय हेलावले. आपला बाळ मकरेंद्र पतीच्या पायाखाली तुडविला गेला हे पाहून तिने हंबरडा फोडला.

"अहो, हे काय केलंत तुम्ही? आपला बाळ तुमच्या पायाखाली तुडविला गेला."

संतीचा आक्रोश ऐकून गोरोबा भानावर आले. त्यांच्या सारा प्रकार ध्यानात येताच त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. 'माझा बाळ!' म्हणून त्या चिखलात चेंदामेंदा झालेल्या बाळाला त्यांनी उचलण्याचा प्रयत्न केला. पण सर्व व्यर्थ ठरले. मकरेंद्र त्यांच्या पायी मृत्यूमुखी पडला होता.

विठ्ठलाच्या भक्तीत बुडालेल्या आपल्या पतीला संती आक्रोशाने खूप बोलली. 'तुमच्या भजनाला आग लागो!' म्हणून ती आक्रोश करु लागली. "काडी लावा तुमच्या त्या पांडुरंगाला" अशी संती म्हणाली तेव्हा अश्रू ढाळणारे गोरोबाही चिडले, "माझ्या पांडुरंगाला शिव्या देतेस का?" असे म्हणून गोरोबांनी संतीला हातातल्या चिपळ्या मारल्या, जवळचा चाकदांडा घेऊन तिला मारण्यास धावले. तेव्हा वैतागलेल्या संतीने "मला शिवाल तर तुम्हाला विठ्ठलाची आण (शपथ) आहे."

हे ऐकल्यावर गोरोबा तेथेच थांबले. त्यांनी संतीला मारले नाही. फक्त डोळ्यातून अश्रू गाळू लागले. त्यांना आपली मोठी चूक कळली. संतीने लोकांना सांगितले, "छप्पर पडल्याने आमचे बाळ मरण पावले."

गोरोबाच्या जीवनचरित्रातील हा अत्यंत हृदयस्पर्शी अनुभव आहे. या अनुभवातून गोरोबा पूर्णपणे विठ्ठलभक्तीकडे वळले. त्यांनी पुढे संतीला कधीही स्पर्श केला नाही. संती दुःखी झाली. गोरोबाचे वैराग्य असेच वाढत गेले तर आपल्या कुटुंबाचा वंशवेल कसा वाढायचा? या प्रश्नाने ती व्याकुळ झाली. तिने गोरोबाचा विवाह आपल्या बहिणीशी म्हणजे रामीशी करुन दिला. पण तेथेही सास-याने "दोघींला सारखेच जपा, तुम्हाला विठ्ठलाची आण आहे" हे ऐकून गोरोबा पूर्णपणे संसार विरक्त झाले.

- **गोरोबांनी दोन्ही हात तोडले :**

संती व रामी या दोघींना काय करावे ते सूचत नव्हते. दोघीही खूप दुःखी होत्या. आता आपल्या संसाराचा वेल वाढणार नाही. घरात मुलबाळ होणार नाही. दोघींनी गोरोबांना सांगण्याचा खूप प्रयत्न केला. पण सर्व व्यर्थ ठरले. दोघींनी गोरोबांची विठ्ठलाची आण मोडण्याचा निश्चय केला.

एके रात्री त्या दोघी गोरोबांच्या दोन्ही बाजूला झोपल्या. गोरोबांच्या हातांचा स्पर्श दोघींना झाला हे जाग्या झालेल्या गोरोबांच्या लक्षात आले. त्यांना फार दुःख झाले. आपल्या हातून

विठ्ठलाची आण मोडली म्हणून त्यांनी स्वतःलाच शिक्षा दिली. आपले तळव्याचे दोन्ही हात तोडून टाकले. संती व रामी ओक्साबोक्षी रडू लागल्या. पण गोरोबांनी स्वतःलाच शिक्षा दिली.

गोरोबा हाताने थोटे झाल्यामुळे घरात कामधाम होत नव्हते. उपासमार वाढली. गोरोबांची कर्मगती बंद झाली. पण वैराग्य वृत्ती वाढतच गेली. संसारातून त्यांचे मन पूर्णपणे उडाले. ही विठ्ठलभक्ती पाहूनच की काय प्रत्यक्ष पंढरीचे विठ्ठल-रुक्मिणी कुंभार जोडप्याच्या रुपात येऊन त्यांचे कुंभारकाम करु लागल्याची कथा सांगितली जाते.

विठू कुंभार व रुक्मा कुंभारीण सुंदर सुंदर मडके, गाडगे करुन गावात देत होते. गोरोबांचा संसार या दोघांनी सावरला. परंतु ज्ञानदेवादी संतांनी पाहिले की पंढरीत विठ्ठलरुक्मिणी नाही. ही सर्व मंडळी गोरोबांच्या घरी गेले. तेथे प्रत्यक्ष देवच काम करीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

गोरोबांची भक्ती आणि त्यांचे वैराग्य संतजनांच्या लक्षात आल्यावर संतांनी गोरोबांचे दर्शन घेतले. याच वाटेवर प्रवास करीत असताना संतांनी गोरोबांना पंढरीला येण्यास सांगितले. “पंढरीत तुमचे बाळ मिळेल” संती, रामी गोरोबासह पंढरीला गेले. त्यांना ख-या भक्तीचा अनुभव आला. विठ्ठल रुपातच त्यांना आपला बाळ लाभल्याचे समाधान मिळाले.

- **संत नामदेवाचे परीक्षक झाले :**

संत गोरोबांना विठ्ठल मंदिरातील नामदेवांचे कीर्तन फार आवडले. नामदेवांच्या आज्ञेने गोरोबांनी विठ्ठलसाठी टाळी वाजविण्याचा प्रयत्न केला आणि खरोखरच त्यांना परत हात फुटले. (खरे तर संसार काम व भक्ती कामातून वर्ज्य केलेले हात त्यांनी पुन्हा विठ्ठलाच्या भक्तीसाठी खुले केले. विठ्ठलाची आण आता संपली होती.)

संत गोरोबा साक्षात्कारी संत झाले. संतजनांच्या मेळ्यात त्यांना गोरोबा काकांची प्रतिष्ठा लाभली. म्हणून संत मुक्ताबाईंच्या सांगण्यावरुन गोरोबा संत परीक्षक झाले. सर्व संतांच्या डोक्यावर थापटणे थोपटले, पण ‘नामदेवाचे मडके कच्चं राहिले’ असा अभिप्राय गोरोबांनी संतसभेला दिला.

नामदेवांना पुढे विसोबा खेचर यांनी गुरु केले. देव सर्वत्र असतो. ही अद्वैत स्वरुपाची शिकवण त्यांना मिळाली. संत नामदेवांना खरा परमेश्वर सर्वत्र असल्याचे कळले. तो एकट्याचाच नाही. नामदेवांची परीक्षा करणा-या गोरोबांना नामदेवांचा अतिशय जिव्हाळा होता. म्हणून त्यांच्या अभंगात अनेक ठिकाणी ‘नामा म्हणे’चा निर्देश येतो.

- **संत गोरा कुंभार : अभंग विशेष**

संत गोरा कुंभार हे १३ व्या शतकातील एक जुने जाणते संत होते. त्यांच्या नावावर २३ अभंग उपलब्ध आहेत. ‘ईश्वर निष्ठांच्या मांदियाळीत’ संत गोरा कुंभार हे सर्वांचे आदरणीय काका होते. सर्व संत मंडळीत ते वयाने जेष्ठ होते. या संतांचे जीवन व अभंग हे अद्वैत स्वरुपाचे

असल्याचेच प्रत्ययाला येते. त्यांच्या अभंगाचे वेगळेपणही लक्षात येते. संत गोरा कुंभार यांच्या चरित्रातील संदर्भ व अभंगातील अन्वयार्थ यांचे काही वाङ्‌मयीन विशेष नजरेत भरणारे आहेत.

**१. चरित्रात्मक अभंगनिर्मिती :**

संत गोरा कुंभार यांच्या ब-याचशा अभंगात त्यांचे चरित्र सहजपणे डोकावते. देहभान हरवून गोरोबा माती तुडविता तुडविता विठ्ठलाचे भजन करीत. ते म्हणतात,

**''केशवाचे ध्यान धरुनी अंतरी।**
**मृत्तिके माझारी नाचतसे।।१।।**
**विठ्ठलाचे नाम स्मरे वेळोवेळा।**
**नेत्री वाही जळ सद्‌गदीत।।२।।**
**कुलालाचे वंशी जन्मले शरीर।**
**तो गोरा कुंभार हरिभक्त।।३।।**

विठ्ठल भजनात ते इतके दंग होत की आपले स्वतःचे मूल त्यांच्या पायाखाली कधी तुडविले गेले हे त्यांना देखील कळले नाही. संत गोरोबांची उत्कट भक्ती त्यांच्या आचारविचारात होती. त्यांनी एखाद्याला वचन दिले किंवा कोणी विठ्ठलाची शपथ दिली तर ती जिवापाड जपत, पाळत असत.

प्रा. डॉ. अशोक पाटील लिहितात, ''गोरोबांच्या आचरणात विरक्ती, तन्मयता, वचननिष्ठता व करारीपणा हे गुण होते. त्यांनी संसारात राहून संसारातून विरक्ती स्वीकारलेली होती आणि आपले सर्व चित्त, सर्व लक्ष विठ्ठलचरणी रुजू केले होते. विठ्ठलभक्तीत ते सदा तल्लीन असत. काका वचनाचे पक्के होते. दिलेली वचने ते तंतोतंत पाळीत असत.'' [०१]

संत गोरा कुंभार हे ज्ञानदेव-नामदेवांच्या सहवासात वावरलेले संत होते. या दोघांचा प्रभाव गोरोबांवर होता. ते संत जनात मिळून मिसळून राहत. संतांच्याविषयी गोरोबांना आदर होता. त्यांची विचारधारा उच्च कोटीची होती. डॉ. ल. रा. नसिराबादकर लिहितात, ''उच्च पारमार्थिक आनंदासोबतच ईश्वराशिवाय जन्म व्यर्थ जात असल्यामुळे पश्चाताप दग्धतेचेही प्रभाव गोरोबांच्या अभंगातून वाहत असतात.'' [०२]

संत गोरा कुंभार आपल्या मनातील खंत पुढील अभंगातून व्यक्त करतात.

**''जन्म येऊनिया काय केली करणी।**
**व्यर्थ शिणविली जननी।।**
**नऊ महिने ओझे वागवून।**
**नाही गेला तिचा शीण।।**
**ऐसा झालो अपराधी।**
**रामा करा कृपानिधी।।**

आपल्या जीवनात त्यांनी अनेक अनुभव घेतले हा जन्म सार्थकी लागला पाहिजे असा त्यांचा सतत प्रयत्न होता. त्यांनी स्वतः कुंभाराचा व्यवसाय करीत भक्तीमार्गाला वाहून घेतले.

**"देवा तुझा मी कुंभार।**
**नासी पापाचे डोंगर।।**
**ऐशा संतप्त हो जाती।**
**घडे साधूची संगती।।**
**म्हणे कृपा भगवंताची।**
**गोरा कुंभार मागे हेचि।।"**

संत गोरोबांचे अभंग त्यांच्या जीवनाबरोबर समृध्द झालेले आहेत. संती व रामी यांच्यामुळे आपण गोरोबांची शपथ मोडली. दोन्ही बायकांना आपल्या हाताचा स्पर्श झाला. त्यांना तो देवाचा अपमान वाटला म्हणून त्यांनी स्वतःचे हात छाटले. पुढे पंढरीच्या कीर्तनात नामदेवांनी भजनासाठी 'हात वरती करा, भजनात सहभागी व्हा' असे सांगितले. येथे गोरोबांचे थोटे हात त्यांना परत मिळाले. त्या जीवनातल्या शेवटच्या प्रसंगाचे वर्णन त्यांच्या अभंगात आहे.

**"नामा म्हणे गोरोबाशी।**
**वरती करावे हस्ताशी।।**
**गोरा थोटा वरती करी।**
**हस्त फुटले वरचेवरी।।**

संत गोरा कुंभाराचे जीवन त्यांच्या अभंगातून साकार झालेले आहे. या चरित्रात्मक अभंगाची उत्कटता व चित्रमयता लक्षणीय आहे.

**२. अद्वैत तत्त्वज्ञानाचे चिंतन :**

संत गोरा कुंभार अनुभवनिष्ठ संत होते. संत मुक्ताबाईंनी म्हटले आहे,

**"संत हा गोरा जुनाट पै जुने।**
**हाती थापडणे अनुभवाचे।।१।।**
**परब्रह्म म्हातारा निवाला अंतरी।**
**वैराग्याचे वरी पाल्हाळला।।२।।**
**सोहं शब्द विरक्ती डवरली अंतरी।**
**पाहता अंबरी अनुभव।।३।।**
**म्हणे मुक्ताबाई घालू द्या लोटांगण।**
**जाऊ द्या शरण अव्यक्ताशी।।४।।**

संत मुक्ताबाई एक समंजस व तत्त्वदर्शी कवयित्री होत्या. एवढ्या छोट्या वयात त्यांची योग्यता 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' सारख्या अभंगातून व्यक्त होते. एका समजूतदार संत कवयित्रीने संत गोरोबांच्या अनुभवाला चिंतनाची दिशा असल्याचे सांगितले आहे.

**"श्रवण नयने जिव्हा शुध्द करी**
**हरिनामे सोहंकरी सर्व काम"**

या अभंगामधून गोरोबांनी विठ्ठल माहात्म्य सांगता सांगता पंचेद्रियांच्या स्थितीबद्दल उपदेश केला आहे. जीभ, डोळे, कान, त्वचा, नाक यांचे त्यांनी महत्त्व सांगितले आहे. जिभेचे पावित्र्य, त्वचेची शुध्दता, डोळ्यातील भावमयता, नाकाची शुचिता, कानाची मधुरता भक्तीमध्ये हवी. संत गोरोबांनी परमेश्वर हा सर्वांभूती आहे असे सांगितले. महानंदासारखी गणिका, अजामेळासारखा चांडाळ यांची उदाहरणे देऊन गोरोबांनी भक्तीचे माहात्म्य सांगितले आहे. गोरोबांची अभ्यासनीयता, चिंतनशीलता, अनुभवशीलता येथे नजरेत भरते. त्यांचे तत्त्वज्ञान समाजपोषक आहे.

डॉ. निर्मलकुमार फडकुले लिहितात, " अनुभवातून उगवलेली या संताची कविता त्याने घडवलेल्या घाटदार घटासारखीच सुबक व कलापूर्ण आहे. अनुभवाच्या भट्टीत या कुंभाराने आपल्या आयुष्याचे मडके अंतर्बाह्य भाजून पक्के केले होते, यात शंका नाही. सहज बोलता बोलता तत्त्वज्ञानाचे शब्द त्यांची वाणी बोलून जाते. दुःखाच्या अनुभवातून सुखाची वाट चालत असलेले त्यांचे शब्द काहीसे गूढ पण सुंदर वाटतात." [०३]

संत गोरोबांच्या अनेक अभंगात त्यांच्या तत्त्वज्ञानाचे संदर्भ येतात.

**"वंदावे कवणाशी निंदावे कवणाशी।**
**लिंपावे गगनासी कवण लिंपी।।"**

या अभंगातील परमेश्वराला आकारउकार नाही, सर्व जग त्याने भरले असल्याचे त्यांनी सांगितले. चंद्रबिंबाचा संदर्भ घेत येथे त्यांनी अद्वैत तत्त्वज्ञान पटवून दिले आहे.

डॉ. विद्यासागर पाटंगणकर लिहितात, "गोरोबांचे अवघे वीस अभंग उपलब्ध आहेत, परंतु एखाद्या लहानशा जागेत गगनचुंबी इमारत उभी असावी तशी वीस अभंगाच्या मर्यादेत त्यांच्या पारमार्थिक विचारांची उंची प्राप्त करुन घेतली आहे. त्यांच्या उत्तुंग आध्यात्मिक अनुभवांचे दर्शन अल्पशा अभंगातूनही घडते." [०४]

संत गोरोबांचे अभंग हे संवादासारखे आहे. ते परमेश्वराशी, संत नामदेवांशी संवाद साधतांना दिसतात.

**"नामा ऐसे नाम तुझिया स्वरुपा।**
**आवरण आरोपा कोण ठेवी।।"**

या अभंगात असा प्रत्यय येतो. या अभंगातील 'रहितकारण स्वयंप्रकाश' हे शब्द पाहिले तरी आजच्या कृष्णविवर, त्यानिमित्ताने दैवीकरण यांचा अभ्यास यांचा संदर्भ जाणवतो. गोरोबांनी आपल्या अभंगातून हे 'दैविकण' जणू परमेश्वर दर्शनाद्वारे पाहिले होते.

**"अनेकत्व सांडी अनेकत्व सांडी।**
**आहे ते ब्रह्मांडी रुप तुझे।।"**

किंवा

**"माझे रुप माझे विरालेसे डोळा।**
**माझे ज्ञान सामावले माझे बुबळा।।"**

किंवा

**"दृष्टीचे पाहणे परतले मागुती।**
**राहिली निवांत नेत्रपाती।।"**

अशा अनेक अभंगाच्या आशयद्रव्यात संत गोरोबांची तत्त्वदर्शी दृष्टी दिसते.

डॉ. विद्यासागर पाटंगणकर लिहितात, "गोरा कुंभार यांच्या अभंगाचे स्वरुप तत्त्वज्ञानात्मक आहे. तात्त्विक विचारांचे दर्शन त्यातून घडते. तत्त्वचिंतनपर अभंग असे त्यांच्या अभंगाबाबत म्हणता येईल. आपल्या अभंगात नामदेवांचा त्यांनी वारंवार उल्लेख केला आहे. जणू नामदेवांशी ते आत्मसंवाद साधत आहेत. नामदेवांशी संवाद साधतच त्यांची अभंगनिर्मिती चालू असावी." [०५]

संत गोरा कुंभाराची आध्यात्मिक दृष्टी निकोप होती. निर्मलभक्तीची सरोवरे त्यांच्या अभंगाच्या ठायी साठलेली दिसतात. त्यात भक्तीची कमळे उगवलेली आहेत. त्यांचा सुगंध त्यांच्या काव्यनिर्मितीतून प्रकट होतो. या काव्यनिर्मितीमागे समाज प्रबोधनाची शिकवण आहे.

### ३. सामाजिक प्रबोधनाची तळमळ :

संत गोरा कुंभार यांच्या कवितेला वारकरी संप्रदायाची बैठक आहे. वारकरी संप्रदाय आध्यात्मिक उन्नतीच्या माध्यमाद्वारे 'जनसामान्यांचे कल्याण' अपेक्षितो सामाजिक प्रबोधनाची तळमळ या संप्रदायाच्या मुळाशी आहे. संत गोरा कुंभार यांच्या अभंगातून अशी सामाजिक तळमळ व्यक्त झालेली आहे.

**"म्हणे गोरा कुंभार जीवनमुक्त होणे।**
**जग हे करणे शहाणे बापा।।"**

महानुभाव, वारकरी इत्यादी धर्मसंप्रदायाच्या शिकवणुकीत सामाजिक प्रबोधनाची तळमळ दिसून येते. संत गोरा कुंभार हे जाणते व समाजप्रेमी संत आहेत. १७ व्या शतकातील संत तुकारामांनी 'गाथेतून' समाजकल्याणाची प्रखर ज्योत पेटविली. त्यासाठी १३ व्या शतकाचा पायाभूत विचार त्यांच्या समोर होता. संत गोरा कुंभार हे आध्यात्मिक लोकशाहीतील संत आहेत. त्यांच्या तेर

गावी सर्व संतमेळा जमा होतो. सर्वजण त्यांचे दर्शन घेतात. त्यातून त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची प्रचिती येते. त्यांच्या अभंगात 'शहाणे करुनी सोडले सकळजन' हीच तळमळ आहे. समाजातील दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रध्दा दूर झाली पाहिजे. 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' त्या अनुषंगाने जग चांगले व्हावे ही त्यांच्या भक्तीतील खरी मुक्ती आहे, शक्ती आहे. संत गोरा कुंभार म्हणतात,

**"एकमेकामाजी भाव एकविध।**
**असे एक बोध भेदरहित।।"**

संत गोरोबांची ही दृष्टी 'भेदाभेद अमंगळ' सांगणारी आहे. 'संत आणि देव' असा हा भक्तीमार्गात भेद उरत नाही, तसाच संत हा समाजात कधीही भेदभाव मानत नाही. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई व संतमेळ्यातील संतांविषयी संत गोरोबांच्या अभंगातून आदरभाव व्यक्त झाला आहे. संत हे जगाचे कल्याणकारी असतात. संतांचा, साधूचा सहवास त्यांना महत्त्वाचा वाटतो. ते लिहितात,

**"ऐसी संतप्ते हो जाती।**
**घडे साधूची संगती।।"**

हा विचार त्यांना महत्त्वाचा वाटतो. गोरोबांच्या अभंगावर, आचरणावर, संत ज्ञानदेवांचा, नामदेवांचा अधिक प्रभाव, संस्कार जाणवतो. सहवासातून माणूस घडतो, मुक्त होतो. त्याच्या अंतरिक शक्तींना प्रेरणा मिळते. मुळातला झरा वाहू लागतो. संतांचे दर्शन हे त्यांना 'देवाचे' दर्शन वाटते. संतजनांचे दर्शन झाल्यावर संत गोरा कुंभार आपल्या अभंगात लिहितात,

**"ब्रह्म मूर्ती जगी अवतरले।**
**उध्दरावया आले दीनजना।।१।।**
**ब्रह्मादिक ज्यांचे वंदिती पायावणी।**
**नाम घेता वदनी दोष जाती।।२।।**
**अखंडित गोरा त्याची वास पाहे।**
**निशिदिनी ध्यावे संत संग।।३।।"**

माणसाच्या रुपातच देव असतो. मानवाचा सद्‌गुणी स्वभाव हा देवरुप असतो. संतांचे दर्शन म्हणजे ब्रह्मारुपाचे दर्शन होय. अशी त्यांची भावभक्ती आहे. नामदेवाला उद्‌धून 'परियेसी नामदेवा', 'म्हणे गोरा कुंभार', 'नाम्या तुझ्या भेटी', 'नामया जिवलगा' इत्यादी शब्दातून संत नामदेवाबद्दल गोरोबांना किती जवळीक होती, याचा प्रत्यय येतो.

डॉ. विद्यासागर पाटंगणकरांनी लिहिले आहे,

**"स्त्रीपुरुष नामभेदे। शिवपण येकले नांदे"**

हा ज्ञानदेवांचा विचारच त्यांच्या (संत गोरोबांच्या) या वैचारिक भूमिकेमागे मार्गदर्शक स्वरुपात असावा. अध्यात्मातील उच्च विचाराला, चिंतनाला अभंगरुप देण्यात गोरोबा यशस्वी झालेले दिसतात. त्यांच्या अभंगात चिंतनशीलता, तत्त्वदर्शन, आत्मसंवाद हे विशेष आढळतात.'' [०६]

संत गोरा कुंभार यांच्या वाणी व लेखणीत आत्मस्वरुपाचा बोध आहे. वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक, सामाजिक जाणिवांचा आविष्कार आहे. तत्त्वदर्शनाची खोली आहे. त्या तत्त्वदर्शनातूनही सामाजिक तळमळीचा आशय व्यक्त झालेला आहे.

## ४. संत गोरोबांचे अभंग - 'अक्षरमूर्ती'

संत गोरा कुंभार यांनी सुमारे २३ अभंग लिहिले आहेत. संतांचे अभंग उपलब्ध होणे ही तशी फारच अवघड गोष्ट आहे. संतांनी भरपूर वाङ् मयनिर्मिती केली. परंतु राजकीय, धार्मिक, सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रातील प्रतिकूल परिस्थितीमुळे बरेचसे वाङ् मय नष्ट झाले, दुर्लक्षित राहिले, काळाच्या ओघात बदलले गेले. संत गोरा कुंभार यांचा कालखंड (इ.स. १२६७ ते १३०९), (इ.स.१२६७ ते १३१७) सर्वसाधारणपणे कोणी ४२ वर्षाचा, कोणी ५० वर्षाचा दाखविलेला आहे. इतर संतांच्या बाबतीतही असा प्रत्यय येतो. ज्ञानेश्वर एक की दोन? तुकारामांचे अभंग ४५०० की ४६०० की ८००० असा वाद सातत्याने लक्षात येतो. संतांचा जीवनकाळ, वाङ् मय, अस्तित्व, चमत्कार, व्यक्तीभेटी इत्यादींविषयी खूप चर्चा झाली आहे, होत आहे. संत गोरा कुंभार यांचे ४७ अभंग असल्याचे निदर्शनास आले. कोणी २३ अभंग म्हणतात, कोणी २९, कोणी २० अभंग असल्याचा उल्लेख करतात. [०७] यापेक्षाही आणखी काही अभंग असतीलही पण त्यांचा शोध लागत नाही. असो,

संत गोरा कुंभार यांनी किती जीवनकाळ व्यतीत केला किंवा त्यांनी किती अभंग लिहिले यापेक्षा त्यांचे स्थान, माहात्म आणि लेखन किती गुणवत्ताशील आहे हे लक्षात घेतले पाहिजे. संख्यात्मक मोजणीपेक्षा गुणवत्तेची थोरवी लक्षात घेतली पाहिजे.

किसनमहाराज साखरे यांनी लिहिले आहे, ''गोरोबांची अभंगवाणी अशी इवली असली तरी तिची अर्थव्याप्ती मात्र समुद्राहून सखोल आहे आणि प्रत्येक शब्द 'अर्थभरीत' असाच आहे, यात वाद नाही. गीता ही श्रीकृष्ण प्रभूंची वाङ् मयमूर्ती आहे. अशेष शब्दब्रह्म ही श्रीगणेशाची निर्दोष वर्णसंपन्न वपू आहे. ज्ञानेश्वर महाराजांची वाङ् मयनिर्मिती ही ज्ञानराजांची वाङ् मयमूर्ती आहे. तशीच वीस अभंगाची संहितारुप वाङ् मयमूर्ती ही गोरोबाकाकांची अक्षरमूर्तीच होय.'' [०८]

संत गोरा कुंभार यांच्या अभंगाचे वाङ् मयीन, आध्यात्मिक पातळीवरचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. या अभंगांना सामाजिक जाणिवेचा पदरही आहे. त्यामुळेच सामाजिक तळमळीचा संदर्भ त्यांच्या अभंगातून येतो. संत जनाबाईंनी 'विठू माझा लेकुरवाळा' या अभंगात सर्व संतजन विठ्ठलाच्या अवतीभोवती असल्याचा साक्षात्कार घडवला आहे.

**'विठू माझा लेकुरवाळा**

**संगे लेकुरांचा मेळा।।'**

या अभंगात अनेक संताबरोबर गोरोबांचा उल्लेख पुढीलप्रमाणे केला आहे.

**"गोरा कुंभार मांडीवरी।**

**चोखा जीवा बरोबरी।।"**

संत गोरोबा काय किंवा चोखा मेळा काय समाजातील खालच्या स्तरातील लोक विठ्ठलाच्या भोवती आहेत. सामाजिक भेदाभेदांची उतरंड तेथे गळून पडली आहे.

संत गोरा कुंभार यांच्या अल्पशा अभंगातही त्यांची निकोप काव्यदृष्टी आणि सामाजिक जाणिवांची प्रचिती येते.

**५. लक्षणीय शब्दसंहिता व उत्कटता :**

संत गोरा कुंभार यांच्या अभंगात काही ठिकाणी सोपेपणा दिसून येतो.

**"देवा तुझा मी कुंभार।**

**नासी पापाचे डोंगर।।"**

स्वतःच्या जीवनाकडे भक्तीभावाच्या नजरेतून ते पाहतात. आपले जीवन सर्वसामान्य पातळीवरचे आहे याची त्यांना खंत आहे. हे चटकन लक्षात येते.

**"मुकिया साखर चाखावया दिधली।**

**बोलता हे बोली बोलवेना।।"**

अशा ठिकाणीही मुका माणूस व साखरेची गोडी यांची उदाहरणे व त्यातील अबोलपण लक्षात येते. परंतु ब-याच शब्दांचा सामान्य माणसाला उलगडा होणार नाही. अशी अवघड शब्दसंहिताही दृष्टीस पडते.

'माझारा', 'अनुसंधानी', 'अनेकत्व', 'झनकूट', 'सत्रावीचे नीर', 'श्रृती', 'आत्मवस्तू', 'भ्रांती', 'परियेसी', 'खेचरी', 'आम्हीते', 'राशी राहणे', 'शब्द खुंटला अनुवाद', 'झाली झडपणी न लिपेचि कर्मी', 'चंद्रबिंब बिंवले पै साचे', 'आवरण अरापो', 'संकल्पाचे गिळते चित्त', 'दृष्टीचे पाहणे', 'विरलासे डोळा', 'रहितकारण', 'चिद्रुप अवघा', 'दिवटा', 'होसीगा सुभद्रा', 'अजामिळ परम चांडाळ', 'सगुणाचे बुंथी', 'सेवू सुखे', 'लखलखाट', 'लेश' असे शब्द, वाक्प्रचार, वाक्ये यांचा सर्वसामान्य माणसाला चटकन अर्थबोध होत नाही. संत गोरोबांची वैचारिक उंची प्रभावी असल्याची प्रचिती येते. त्यांच्यावर संस्कृत भाषा अथवा अनुभवाअंती प्रचिती यामुळे त्यांच्या भाषेत असा उच्च कोटीचा, आध्यात्मिक उंचीचा अनुभव असावा. ज्ञानेश्वर भावंडाचा सहवासही येथे लक्षात घेतला पाहिजे. संत गोरा कुंभार यांच्या

अभंगातील काही शब्द अभंग दुर्बोधता व्यक्त करीत असले तरी त्यातील आध्यात्मिक गोडी, आध्यात्मिक उंची यांचा समतोलपणा साधला आहे.

डॉ. ल. रा. नसिराबादकर लिहितात, "गोरोबांच्या अत्यंत साध्या अशा अभंगरचनेत संपन्न आणि सात्त्विक असा ज्ञानानुभव साठविला आहे." [९]

डॉ. ललित गुप्ते लिहितात, "संत गोरोबांचे अभंग साधे, सोपे, रसाळ, गेय आणि अर्थपूर्ण आहेत. म्हणूनच ते आजही विठ्ठलभक्त वारकरी आवडीने म्हणतात." [१०]

या समीक्षकांच्या मतांचा प्रत्यय संत गोरोबांच्या अभंगात ठिकठिकाणी येतो. मूलतः संतांनी अभंग निर्मिती ही सर्वसामान्य समाजासाठी केली. ती वारकरी संप्रदायांनी प्रवाहीत ठेवली आहे. म्हणूनच ती लोकप्रिय आहे.

- **समारोप :**

या त-हेने संत गोरा कुंभार यांचे चरित्र हे एका उत्कट भक्ताचे चरित्र आहे तर त्यांची अभंगवाणी जशी हृदयस्पर्शी आहे, तशीच ती वाङ्‌मयीन गुणांनी समृध्द आहे. त्यांच्या अभंगवाणींचे अनेक विशेष नजरेत भरणारे आहेत. भक्तीमयता, भावपूर्णता, उत्कटता, सहजता, गोडवा असणारे, सोपेपणा, सुलभरचना, ऋतुला असणारे, गेय, माधुर्य असणारे, साधे पण अर्थपूर्ण असे हे अभंग आहेत. मध्ययुगीन मराठी वाङ्‌मयात संतमेळ्याची अभंगवाणी ही खरोखरच 'अभंग' राहिलेली आहे. त्याला हीच कारणे आहेत. वारकरी संप्रदायाचा अखंड भक्तीप्रवास आणि विचारसुलभता यामुळेच संत गोरा कुंभार यांची अभंगवाणी व चरित्रात्मक प्रचिती अजरामर झाली आहे.

- **संदर्भ टीपा :**

०१) अशोक पाटील, 'मराठीचे संत मानकरी', प्रकाशक, आनंद हांडे, मनोकामना प्रकाशन, शिवनगर, इस्लामपूर (सांगली), १९९७, पृ. ५१.
०२) ल. रा. नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास', प्रकाशक, सौ. भाग्यश्री मोरेश्वर फडके, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ५ सप्टेंबर १९९७, पृ. ७५.
०३) निर्मलकुमार फडकुले, 'संत सहवास', प्रकाशक, सुनिल अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, सप्टेंबर १९९५, पृ. १०९, ११०.
०४) विद्यासागर पाटंगणकर, 'मध्ययुगीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास', प्रकाशक, सौ. दीपाली वि. कुलकर्णी, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ८३.
०५) तत्रैव, पृ. ८३.
०६) तत्रैव, पृ. ८५.

०७) संत गोरा कुंभार यांचे ४७ अभंग 'सर्वसंग्राह्य गाथे'त आहेत. २० अभंग 'सकलसंत गाथे'त, 'संत गोरा कुंभार जीवनचरित्र' या कीर्तन आख्यानातील तीन धरुन २३ अभंगाचा निर्देश आहे. डॉ. प्रकाश कुंभार (कोल्हापूर) यांच्या 'श्री संतशिरोमणी गोरा कुंभार चरित्र' (मे २००३) यामध्ये २३ अभंगाची संहिता आहे.

०८) किसनमहाराज साखरे, 'स्वस्तिश्री', दिवाळी अंक, पुणे, १९८८, पृ. १२.

०९) ल. रा. नसिराबादकर, उनि, पृ. ७६.

१०) ललित गुप्ते, 'संतांचं थापटणं' प्रकाशिका / मुद्रक, सौ. मनिषा मंगेश गुप्ते, 'आपुलकी' संस्था, पुणे ३०, २५ नोव्हेंबर २०१३, पृ. ४८.